# प्रकरण तीन

## संशोधनाची कार्य पद्दती

३:१ प्रास्ताविक

३:२ संशोधन सामग्रीचे स्वरूप

३:३ सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने

३:१ शिक्षकासाठी प्रश्नावली

३:२ अधिव्याख्यात्यासाठी प्रश्नावली

३:३ मराठी अध्यापन पद्दतीचे अध्यापन करणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती.

३:४ जनसंख्या आणि नमुना निवड

३:५ सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थ निर्वचन

३:६ समारोप

## प्रकरण - ३

## संशोधनाची कार्यपद्धती

### ३.१ प्रास्ताविक :-

प्रकरण दोन मध्ये मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भागाची व प्रात्यक्षिक कार्याची उद्दिष्टे, उद्दिष्टांचे स्पष्टीकरण तसेच त्यांची कार्यवाही कशा प्रकारे केली जाते, यांचे विवेचन केलेले आहे.

प्रस्तुत संशोधनास संशोधिकेस बी. एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमासंदर्भात संशोधन विषयाची वर्तमान परिस्थिती अभ्यासावयाची असलेने त्यासाठी सर्वेक्षण पद्धतीच्या प्रकारामधील नमुना निवड ( Sample Survey ) या पद्धतीचा वापर केला आहे. मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचे सर्वेक्षण या पद्धतीने योग्य प्रकारे मूल्यमापन करता येईल अशी अपेक्षा आहे.

सर्वेक्षण ही शैक्षणिक संशोधनाची एक महत्त्वपूर्ण पद्धती आहे. सर्वेक्षण ( Survey ) आदर्शमूलक सर्वेक्षण( Normative Survey ) स्तर ( Status ) आणि वर्णनात्मक पद्धती ( Descriptive Method ) अशा विविध नावांनी ती प्रचलित आहे. अभ्यास वस्तूची वर्तमानस्थिती कशी आहे, हे पाहण्या करीता वापरली जाणारी ही पद्धती आहे.

विशिष्ट बाबतीत असलेली सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या संशोधन पद्धतीला सर्वेक्षण पद्धती असे म्हणतात. या प्रकारचे संशोधन सद्य:स्थितीचे वर्णन करते व सद्यस्थिती स्पष्ट करते. वर्तमानात असलेले संबंध, प्रचलित परिपाठ, दिसून येणाऱ्या निष्ठा, दृष्टिकोन आणि अभिवृत्ती, सुरू असलेल्या प्रक्रिया, जाणवणारे परिणाम, विकसीत होत असलेले विचार प्रवाह यांच्याशी ते संबंधित असते.

सर्वेक्षणातून खालील तीन प्रकारची माहिती संकलित केली जाते.

(१) वर्तमान स्थिती

(२) अपेक्षित स्थिती

(३) आवश्यक साधनांचा बोध

सर्वेक्षणा मुळे विशिष्ठ क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते. कोणकोणत्या बाबी, कोणत्या कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत याची माहिती कळते. समस्या निराकरणा करीता स्थिती अपेक्षित आहे हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते आणि ही अपेक्षित स्थिती प्राप्त करुन अभ्यास विषयाची उकल करण्या करिता कोणत्या साधनांची व प्रयत्नांची आवश्यकता आहे. हे त्यामुळे कळते.

प्रस्तुत संशोधनाचे पुढील ३ भाग पडतात.

(१) पहिल्या विभागात मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे सामर्थ्य व उपयुक्तते विषयी माहिती मिळविणे ही माहिती शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील पदवी प्राप्त करुन जे शिक्षक आज सेवेत आहेत. त्यांना आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी अध्यापन पध्दती शिकविणा-या अधिव्याख्यात्यांना प्रश्नावली देऊन मिळविली जाईल. मराठीचा शिक्षक सक्षम, समृध्द संपन्न बनविण्याच्या दृष्टीने करता येणारे सर्व प्रयत्न आणि महत्त्व याचा अभ्यास केला जाईल.

(२) दुस-या विभागात मराठी पाठ्यक्रमांतर्गत निर्माण झालेले दौर्बल्य काढून टाकण्याच्या दृष्टीने मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील त्रुटींचा शोध घेतला जाईल. हा शोध घेताना मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम अनेक वर्षे शिकविलेल्या आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयात काम केलेल्या अशा काही विशेष तज्ञ, अनुभवी, अभ्यासू, प्राध्यापकाच्या मुलाखती मिळणा-या माहितीचा वापर केला जाईल.

(३) तिस-या विभागात त्रुटींचे निराकरण करुन निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे.

१:२ संशोधन सामग्रीचे स्वरुप :-

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेस शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास करावयाचा असल्याने या अभ्यासक्रमाचे अध्ययन ज्या शिक्षकानी केलेले आहे. त्यांची मते पाठ्यक्रमा संदर्भात विचारात घेणे आवश्यक होते. मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमात असणारे घटक व त्यांचे स्वरुप, त्यांची व्यापकता, त्यामध्ये असणारा प्रात्यक्षिकाचा भाग, मराठी विषयाचे अध्यापन करताना शिक्षकाना पाठ्यक्रमातील ज्ञानाची झालेली मदत विचारात घेणे गरजेचे होते. त्यासाठी या पाठ्यक्रमावर आधारित अशी एखादी प्रश्नावली तयार करुन त्यांची मते जाणून घेणे क्रमप्राप्त होते. ही प्रश्नावली संशोधिकेने "परिशिष्ठ "अ" मध्ये दिलेली आहे.

मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्यक्रम शिकविणारा शिक्षक सक्षम, समृध्द व संपन्न बनविण्याच्या दृष्टीने करता येणारे प्रयत्न व महत्व यांचाही अभ्यास आवश्यक ठरतो. तसेच मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमात निर्माण झालेले दौर्बल्य काढून टाकण्याच्या दृष्टीने शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नोकरीत असणाऱ्या प्राध्यापकाशी विचारविनीमय करणे आवश्यक होते. त्यासाठी संशोधिकेने प्रस्तुत संशोधनासाठी एक प्रश्नावली तयार करुन त्यांची मते आजमावणे क्रमप्राप्त होते. त्यासाठी संशोधिकेने एक प्रश्नावली तयार केली आहे. व त्या प्रश्नावलीचा "परिशिष्ठ "ब" मध्ये समावेश केलेला आहे.

प्रश्नावलीद्वारा मिळालेलीमाहिती पडताळण्यासाठी व तिची यथार्थता व विश्वासनीयता आजमावण्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या मुलाखती घेणे आवश्यक होते. संशोधिकेने या मुलाखती घेण्यासाठी प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक - प्रशिक्षकांना भेट दिली आणि मुलाखत घेतली. या मुलाखती साठी काही प्रश्न [illegible] तयार केले आहेत ते प्रश्न परिशिष्ठ"क" मध्ये दिलेले आहेत.

बी.एड्. पदवी संपादन केले मुळे शिक्षकी व्यवसायातील शिक्षकांचे महत्व कळते. व्यवसायाचा दर्जा उंचावत जातो. मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमाचे शिकविणाऱ्या प्राध्यापकाचे प्रोत्साहन, अनुभव, त्यांची सेवा ज्येष्ठता यांचा फारच चांगला उपयोग होत असतो. त्यामुळे मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्यक्रम

शिकविणाऱ्या आणि अधिकाधिक सेवाजेष्ठता असलेल्या काही अधिव्याख्यात्यांची प्रत्यक्ष चर्चा घडवून आणल्या.

:३ सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी सामग्री गोळा करण्यासाठी अभ्यासिकेने पुढील प्रमुख साधनांचा वापर केला.

१. बी.एड्. पदवी संपादन करून नोकरीत असणाऱ्या मराठी शिक्षकांसाठी प्रश्नावली.

२. मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातीलअधिव्याख्यातासाठी प्रश्नावली.

३. मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम अधिकाधिक वर्षे शिकवलेल्या व नोकरीचा अनुभव जास्त असलेल्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती, मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या अधिव्याख्यात्यांशी प्रत्यक्ष भेट व चर्चा.

(१) **शिक्षकांसाठी प्रश्नावली :-**

जे शिक्षक मराठी अध्यापन पद्धती घेऊन बी. एड्. पदवी संपादन केले आणि नोकरीला लागले ते शिक्षक शोधून काढले. संबंधित शिक्षकांच्यासाठी एक प्रश्नावली तयार केली.ही प्रश्नावली परिशिष्ठ "अ" मध्ये दिलेली आहे. या प्रश्नावलीत एकूण २२ प्रश्न विचारण्यात आले होते. त्यातील काही प्रश्न बंदिस्त स्वरूपाचे, काही मुक्त स्वरूपाचे व बरेचसे संमिश्र स्वरूपाचे होते. ही प्रश्नावली तयार करताना काही ठिकाणी "ब्रेनॉर्ड" ने तयार केलेल्या पंचबिंदूश्रेणीचा आधार घेतला. प्रश्नावली भरण्या बाबत योग्य त्या सर्व सूचना प्रश्नावलीच्या प्रारंभीच दिल्या संबंधित शिक्षकांना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणीत (सारणी क्र.३:१ ) केले आहे.

(प्रश्नावली भरून घेताना एक शिक्षक दुसऱ्या शिक्षकांच्या प्रश्नावलीत पाहून प्रश्नांची उत्तरे लिहिणार नाहीत, याची दक्षता घेतली.) परिणामी शिक्षकाकडून मिळालेली उत्तरे अगदी स्वतंत्रपणे लिहिलेली आढळली.

शिक्षकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावली मध्ये शिक्षकांनी नोंदविलेल्या उत्तराचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करताना अधिव्याख्यातासाठी तयार केलेल्या प्रश्नावली मधील माहितीचा पूर्णपणे उपयोग केला.

सारणी क्रमांक ३:१

मराठी अध्यापन पद्धतीचा सुधारित पाठ्यक्रम घेऊन बी. एड्. पदवी पदवी संपादन केलेल्या व नोकरीत असणाऱ्या मराठी शिक्षकासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण

| अनुक्रम | प्रश्नक्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १ | १ ते ६ | – | शिक्षकांची सर्व साधारण माहिती, त्यांच्याशी संपर्क साधण्यास उपयुक्त व्हावी अशी. |
| २ | ७ | संमिश्र | मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाची उपयुक्तता जाणणे. |
| ३ | ८ | समिश्र | कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील कोणते घटक उपयुक्त आहेत.हे जाणणे. |
| ४ | ९ | संमिश्र | कोणते घटक उपयुक्त ठरत नाहीत,हे जाणणे |
| ५ | १० | मुक्त प्रश्न | मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात आणखी भर घालावी लागते का हे जाणणे. |
| ६ | ११ | मुक्त प्रश्न | पाठ्यक्रमात भर घालण्याची आवश्यकता जाणणे. |
| ७ | १२ | मुक्त प्रश्न | पाठ्यक्रमातील घटकांच्या उपयुक्ततेचे प्रमाण जाणून घेणे. |
| ८ | १३ | संमिश्र प्रश्न | मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाची सामर्थ्यता जाणून घेणे. |

| अ.क्र. | प्रश्नक्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| ९ | १४ | संमिश्र प्रश्न | अभ्यासपुरक कार्यक्रमाचा मराठी अध्यापनात होणारा उपयोग माहित करुन घेणे. |
| १० | १५ | संमिश्र प्रश्न | अध्यापन साहित्याचा होणारा उपयोग जाणून घेणे. |
| ११ | १६ | संमिश्र प्रश्न | मराठी अध्यापनाच्या विविध पद्धतींचाउपयोग माहित करुन घेणे. |
| १२ | १७ | संमिश्र | मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रमाची माध्यमिक स्तरावर राबवत असलेल्या पुनरहचज अभ्यासक्रमासाठी उपयुक्तता जाणून घेणे. |
| १३ | १८ | मुक्तप्रश्न (पंचबिंदूश्रेणी) | मराठीचे अध्यापनकरत असताना मराठी अध्यापन पद्धतीचे महत्व ओळखणे. |
| १४ | १९ | मुक्त (पंचबिंदूश्रेणी) | मराठी अध्यापन पद्धतीच्या प्रात्यक्षिक कार्याचे महत्व शोधणे |
| १५ | २० | संमिश्र | आशययुक्त अध्यापन पद्धतीचा मराठी अध्यापनास होणारा उपयोग शोधून काढणे. |
| १६ | २१ | संमिश्र | पाठ्येतर शाळेत राबविल्या जाणा-या उपक्रमाचा उपयोग माहित करुन घेणे. |
| १७ | २२ | संमिश्र | मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग जाणून घेणे. |
| १८ | २३ | मुक्तप्रश्न | मराठी अध्यापन पद्धती या पाठ्यक्रमा विषयीची इतर माहिती करुन घेणे. |

याप्रमाणे संशोधिकेने शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधून बी. एड्.पदवी घेतलेल्या आणि मराठी शिक्षक म्हणून नोकरीत असणा-या शिक्षकासाठी एक प्रश्नावली तयार केली. या प्रश्नावली मध्ये एकूण २३ प्रश्न होते. त्यातील काही प्रश्न मुक्त होते तर काही प्रश्न संमिश्र व बंदिस्त स्वरूपाचे होते.

वरील प्रश्नावली प्रमाणेच संशोधिकेने शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी अध्यापन पद्दती शिकविणाऱ्या अधिव्याख्यातासाठी एक प्रश्नावली तयार केली आहे. या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणी मध्ये (२:२) मध्ये दिलेले आहे.

अधिव्याख्यात्यांसाठी प्रश्नावली :-

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेस कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास करावयाचा असलेने बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या अधिव्याख्यात्यांची मते विचारात घेण्यासाठी अधिव्याख्यात्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला. अभ्यासिकेने मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या अधिव्याख्यात्यांसाठी एक प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली परिशिष्ट "ब" मध्ये दिली आहे.

प्रश्नावली तयार करताना मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भाग शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या अधिव्याख्यातेसाठी सर्व साधारण माहिती मध्ये ११ मुख्य प्रश्न तात्त्विक भागा मध्ये १५ मुख्य प्रश्न आणि प्रात्यक्षिक कार्यावर १७ मुख्य प्रश्न विचारले होते. सर्व प्रश्नासाठी आवश्यक त्या सूचना प्रश्नावलीच्याप्रारंभीच दिल्या होत्या आणि आवश्यक त्या त्या प्रश्ना समोर मोकळी जागा सोडली अधिव्याख्यातेंना मोकळ्या सोडलेल्या जागेत आपली व्यक्तिगत मते लिहिण्यास सांगितली होती काही ठिकाणी अधिव्याख्यात्यांनी त्रोटक उत्तरे लिहिली होती. त्यांची पुन: भेट घेऊन पुरवणी माहिती मिळविली. यावेळी अधिव्याख्यातेंनी प्रकट केलेली मते जशीच्या तशी संशोधिकेने ज्या - त्या प्रश्नावलीत नोंदवून घेतली काही अधिव्याख्यात्यांना प्रश्नांचा अर्थ कळत नव्हता. म्हणून प्रश्नांचे विश्लेषण करून सांगावे लागले. अशाप्रकारे प्रत्येक प्रश्नाची उत्तरे नोंदविण्यास सांगितली.

संशोधिकेने उपरोक्त अधिव्याख्यात्यांची प्रश्नावली भरण्यासाठी नमुना शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील संबंधित प्राचार्य व अधिव्याख्यात्यांच्याकडून दिवस आणि वेळ मागून घेतली ठरलेल्या दिवशी महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन नमुना अधिव्याख्यात्याकडून प्रश्नावली भरून घेतली. प्रश्नावली भरून घेताना अधिव्याख्यात्यास (त्यांच्या केबीनमध्ये बसण्याविषयी विनंती केली) त्यांना सुरुवातील प्रश्नावलीच्या प्रारंभी दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचण्यास सांगितल्या; तसेच प्रश्नावलीमधील एकूण ४३ प्रश्ना पैकी प्रत्येक

प्रश्न काळजीपूर्वक वाचून त्यांच्यासमोर आपली उत्तरे नोंदविण्यास सांगितले. प्रश्नावली भरण्यासाठी त्यांना १२० मिनीटे वेळ दिला. अधिव्याख्याते प्रश्नावली भरत असताना इतर सहकारी वर्गाचा त्रास होणार नाही किंवा ते स्वतः प्रशिक्षणार्थी बरोबर चर्चा करणार नाहीत; याची दक्षता घेतली परिणामी त्यांच्याकडून मिळालेली उत्तरे अगदी स्वतंत्रपणे लिहिलेली आढळली.

अशा प्रकारे पंधरा अधिव्याख्यातींच्याकडून प्रश्नावली भरून घेतल्यानंतर प्रत्येक प्रश्नाबाबत नोंदविलेली मते एकत्र केली. संबंधित अधिव्याख्यात्यांना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणीत ( सारणी क्र. ३:२ ) दिले आहे. त्यानंतर प्रत्येक प्रश्ना बाबत अधिव्याख्यात्यांनी नोंदविलेल्या उत्तराचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले.

### सारणी क्रमांक ३.२

शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या प्राध्यापकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण :-

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १ | १ ते ३ | - | अधिव्याख्यात्यांची सर्व साधारण माहिती जाणून घेणे. |
| २ | ४ ते ६ | - | अधिव्याख्यात्यांचा मराठी अध्यापन पद्धती संबंधीचा अनुभव जाणणे. |
| ३ | ७ ते ९ | - | अधिव्याख्यात्यांच्या परीक्षेचे विषय जाणून घेणे. |
| ४ | १० व ११ | - | अधिव्याख्यात्यांच्या सेवेचे विषय जाणून घेणे. |
| ५ | १२ | संमिश्र | मराठीचा कुशल शिक्षक तयार करण्यासाठी असणारा मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम जाणून घेणे. |
| [illegible] | १३ | संमिश्र | मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाची उपयुक्तता जाणून घेणे. |
| ७ | १४ | संमिश्र | पाठ्यक्रमात आणखी अत्यावश्यक असणारे घटक जाणून घेणे. |
| ८ | १५ | संमिश्र | पाठ्यक्रमातील असणाऱ्या घटकांचे गुणावगुण शोधणे. |

| अ.नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरुप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| ९ | १६ | संमिश्र | अनावश्यक घटक जाणून घेणे. |
| १० | १७ | संमिश्र | अनावश्यक घटकांची कारण मीमांसा माहित करुन घेणे. |
| ११ | १८ | संमिश्र | अभ्यासपूरक कार्यक्रमांचा आढावा घेणे. |
| १२ | १९ | संमिश्र | सद्यस्थितीला आवश्यक पण न आलेला भाग कारणासहित जाणून घेणे. |
| १३ | २० | बंदिस्त | काळाच्या गरजेनुसार असणारी पाठ्यक्रमाची उपयुक्तता जाणून घेणे. |
| १४ | २१ | संमिश्र | अध्यापन पद्धतीच्या दृष्टीने हा पाठ्यक्रम न्याय देण्यास पात्र असल्याचे जाणणे. |
| १५ | २२ | संमिश्र | माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये असणारी या पाठ्यक्रमाची उपयुक्तता जाणून घेणे. |
| १६ | २३ | संमिश्र | मराठी अध्यापन पद्धतीच्या तात्त्विक भागाचे सामर्थ्य वाढविणे. |
| १७ | २४ | संमिश्र | मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन करण्याचे सामर्थ्य जाणणे. |
| १८ | २५ | मुक्त | काळाची गरज व शिक्षणातील संबंध ओळखणे |
| १९ | २६ | मुक्त | संबंधित संशोधनास उपयुक्त असणारी अन्य माहिती मिळविणे. |

प्रात्यक्षिक कार्य

| | | | |
|---|---|---|---|
| १ | १ | संमिश्र | मराठी अध्यापन पद्धतीमधील प्रात्यक्षिक कार्याच्या सामग्रीचे [illegible] करणे |
| २ | २ | संमिश्र | संबंधित पाठ्यक्रमातील क्रमबद्धता ओळखणे |
| ३ | ३ | संमिश्र | कौशल्य क्षमता साध्य करण्यास असणारे सूक्ष्म अध्यापन पुरेसे आहे काय हे जाणून घेणे. |

| अ.नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| ४ | ४ | संमिश्र | आपणाकडी सूक्ष्म अध्यापन कौशल्ये हवीत का ? हे जाणणे. |
| ५ | ५ | मुक्त | आशययुक्त अध्यापनाच्या कृतिसत्राची कार्यवाही जाणणे. |
| ६ | ६ | मुक्त | पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तकातील संबंध अभ्यासणे. |
| ७ | ७ | संमिश्र | कृतिसत्रामुळे आशय व पद्धतीचे सहेतुक एकात्मिकरण होते का ? हे जाणून घेणे. |
| ८ | ८ | संमिश्र | सरावपाठ प्रशिक्षणाचा कार्यक्रम जाणून घेणे. |
| ९ | ९ | संमिश्र | प्रशिक्षणार्थ्यांना पुरेसे मार्गदर्शन मिळते का ? |
| १० | १० | मुक्तप्रश्न | सलग सरावपाठ प्रशिक्षणाचा कार्यक्रम जाणून घेणे. |
| ११ | ११ | मुक्त | सलग सरावपाठा संबंधीचे नियोजन जाणून घेणे. |
| १२ | १२ | मुक्त | सलग सरावपाठात असणारी आवश्यकता जाणून घेणे. |
| १३ | १३ | संमिश्र | पाक्षिक शाळेचा कार्यक्रम जाणून घेणे. |
| १४ | १४ | संमिश्र | प्रात्याक्षिक पाठ परीक्षासाठीची मूल्यमापन पद्धती जाणून घेणे. |
| १५ | १५ | संमिश्र | मूल्यमापन कृतिसत्राच्या कार्यक्रम जाणून घेणे. |
| १६ | १६ | मुक्त | मूल्यमापन कृतिसत्र बद्दलचे समाधान जाणून घेणे. |
| १७ | १७ | | संबंधीत संशोधनास उपयुक्त असणारी माहिती जाणून घेणे. |

वरील प्रमाणे संशोधिकेने अधिव्याख्यातांसाठी प्रश्नावली तयार केली आहे. यामध्ये मराठी अध्यापन पद्धतीच्या सैध्दान्तिक भागावर एकूण १९ प्रश्न विचारले आहेत तर प्रात्यक्षिक कार्यावरील एकूण प्रश्न १७ आहेत. दोन्ही भागातील प्रश्नाचे स्वरूप मुक्त, बंदिस्त व संमिश्र आहे. तसेच यामध्ये प्रश्न विचारण्या पाठीमागाचे उद्दिष्ट दिले आहे.

वरील दोन्ही प्रश्नावलीची पडताळणी पहाण्यासाठी अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेणे आवश्यक होते. म्हणून कोल्हापूर जिल्हयातील प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जावून तेथील मराठी अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेतल्या या मुलाखती घेण्यासाठी एक प्रश्नावली तयार केली आहे. या प्रश्नावली मध्ये काही मुख्य प्रश्न घेतले व त्याअनुषंगाने इतर ही माहिती प्राप्त केली. मुलाखतीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

<u>अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती :-</u>

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांची व्यक्तिमत्वाची जडणघडण करण्यात आणि महाविद्यालयातील कामकाजाचे संचालन व संवर्धन करण्या मध्येही मराठी अधिव्याख्यात्यांचा सिंहाचा वाटा असतो. होवू पहाणा-या किंवा शिक्षणक्षेत्रात पदार्पण करणा-या शिक्षकांच्या अभिरुची व अभिवृत्ती इष्ट प्रकारे परिपोषित होण्यासाठी अधिव्याख्यात्यांचे अध्यापन, अनुभव, सहाय्यभूत ठरते. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अनेक शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी सहकार्य वृत्ती जोपासण्यामध्ये मराठी अधिव्याख्यात्यांचा सहभाग उत्तम असतो. प्रस्तुत संशोधना संदर्भात अधिव्याख्यात्यांच्या बरोबर काही प्रश्ना बाबत चर्चा करुन संवाद साधणे आवश्यक होते. तसेच एका वर्षाच्या कालावधी मध्ये मराठी विषयांशी संबंधित असलेले अनेक उपक्रम कशा प्रकारे कार्यवाहीत आणले जातात तेही जाणणे आवश्यकच होते.

उपरोक्त संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती व त्यांच्या अंतरंगात लपलेली माहिती कळत - नकळत काढून घेण्याच्या हेतूने संशोधिकेने मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली मुलाखतीचे प्रश्न तयार करुन घेतले. यातील काही प्रश्न मुक्त स्वरूपाचे काही बंदिस्त स्वरूपाचे आणि काही संमिश्र स्वरूपाचे होते. संबंधित मुलाखती घेण्यासाठी तयार केलेल्या प्रश्नांचे विश्लेषण पुढील सारणीत ( सारणी क्र. ३.१ )मध्ये दिले आहे. तसेच या मुलाखतीचे प्रश्न ("परिशिष्ठ क.) मध्ये देण्यात आलेले आहेत.

सारणी क्रमांक ३:३

मराठी अध्यापन पद्धती घेणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेण्यासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण :-

| अ.नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरुप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १) | १ | मुक्त प्रश्न | मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाची उपयुक्तता जाणून घेणे. |
| २ | २ | बंदिस्त प्रश्न | मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात उपयुक्त नसलेला भाग जाणून घेणे. |
| ३ | ३ | मुक्त प्रश्न | संबंधित पाठ्यक्रमात उपयुक्त नसलेल्या भागाची कारणे जाणून घेणे. |
| ४ | ४ | मुक्त प्रश्न | संबंधित पाठ्यक्रमात आवश्यक असणारा वैकल्पिक भाग जाणणे. |
| ५ | ५ | मुक्त प्रश्न | संबंधित पाठ्यक्रमाच्या प्रात्यक्षिक कार्याची उपयुक्तता जाणून घेणे. |
| ६ | ६ | मुक्त प्रश्न | संबंधित पाठ्यक्रमातील उपयुक्त नसलेला प्रात्यक्षिक भाग शोधून काढणे. |
| ७ | ७ | मुक्त प्रश्न | प्रात्यक्षिक कार्यातील उपयुक्त नसलेल्या भागाची कारणे माहित करुन घेणे. |
| ८ | ८ | संमिश्र प्रश्न | आवश्यक असलेल्या प्रात्यक्षिक भागाचा शोध घेणे. |
| ९ | ९ | मुक्त प्रश्न | एकूण अभ्यासक्रमातील त्रुटींचा शोध घेणे. |
| १० | १० | बंदिस्त प्रश्न | कोणत्या त्रुटी आहेत ते पहाणे. |
| ११ | ११ | मुक्त प्रश्न | अन्य उपयुक्त माहिती. |

या प्रमाणे अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेण्यासाठी एकूण १३ प्रश्न तयार केले.

३.४ जनसंख्या आणि नमुना निवड :-

कोल्हापूर जिल्ह्यामधील १५ शिक्षणशास्त्र महाविद्यालयापैकी एक वर्षीय बी. एड्. पदवीचा अभ्यासक्रम असणारी अनुदानित व विनाअनुदानित अशी १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालये निवडली. प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा चिकित्सात्मक अभ्यास केलेला आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांची संख्या १२० असून दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालयात )(इचलकरंजी , गडहिंग्लज ) दोन अधिक तुकड्या असल्याने ही अधिव्याख्यात्यांची संख्या १२२ इतकी होते. त्यापैकी मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या प्राध्यापकांची १५ इतकी संख्या यादृच्छिक न्यादर्शनाने निवडली.

तसेच संपूर्ण जनसंख्येचे प्रतिनिधीत्व करू शकेल असा मराठी शिक्षकांचा गट निवडला हा गट (यादृच्छिक न्यादर्शनाने निवडला) या गटाची संख्या निश्चित करताना प्रत्येक एक वर्षीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधील मराठी अध्यापन पद्धती निवडलेले सर्व प्रशिक्षणार्थी घेतले. त्यांची नांवे व पत्ते नोंदून घेतले. ही संख्या जास्त होती पण त्यातून जे नोकरीला लागलेले आहेत आणि ज्यांनी सुधारित अभ्यासक्रम अभ्यासलेला आहे अशांचा विचार केला ही संख्या एकूण जनसंख्येपेक्षा कमी होती.

वरील प्रमाणे तेरा शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधून अधिव्याख्याते व शिक्षकांची संख्या निश्चित केली.

प्रस्तुत संशोधनासाठी घेतलेल्या कोल्हापूर जिल्ह्यामधील १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अधिव्याख्यातेची नांवे व ते शिकवित असलेल्या अध्यापन पद्धती यांची निवड पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

सन १९९३ ते १९९५ २ कॉ.

| अ.नं. | कोल्हापूर जिल्ह्यातील १ वर्षीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे नांव | मराठी अध्यापन पद्धतीच्या अधिव्याख्यात्यांचे नांव | शिकविणारी अध्यापन पद्धती |
|---|---|---|---|
| १) | आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी | श्री.बी.बी.सोळसे | मराठी |
| २) | बाळासाहेब गणपतराव खराडे कॉलेज ऑफ एज्युकेशन कोल्हापूर | श्री.एस.एस.दीक्षित | -"- |
| ३) | वसंतराव नाईक कॉलेज ऑफ एज्युकेशन, कोल्हापूर | श्री.के. एन. संगळे | -"- |
| ४) | सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर | श्री.एम.बी.वेदांते | -"- |
| ५) | कॉलेज ऑफ एज्युकेशन, पेठवडगांव | श्री.व्ही.एच.पाटील | -"- |
| ६) | छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन रूकडी | सौ.सरपोतदार बी.ए. | -"- |
| ७) | इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इचलकरंजी. | श्री. सोलापूरे जी.ए | -"- |
| ८) | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कागल | सौ.पत्राळके ए.ए. | -"- |
| ९) | यशवंतराव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोडोली. | श्री.व्ही.आर.पाटील | -"- |
| १०) | कल्पवृक्ष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जयसिंगपूर. | सौ.भोसले (भणगे) | -"- |
| ११) | जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गडहिंग्लज. | सौ. सरदेसाई एस.ए. | -"- |
| १२) | डी.के.शिंदे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गडहिंग्लज. | श्री.रायकर एस.एस. | -"- |
| १३) | श्रीमती महाराणी ताराबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, कोल्हापूर | श्री.पाटणकर एस.बी | -" |

१५

:५ सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थ निर्वचन :-

कोल्हापूर जिल्हयामधील १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पध्दतीचा पाठयक्रम शिकविणाऱ्या मराठी अधिव्याख्यात्यांची व मराठी अध्यापन पध्दती घेऊन (बी. एड्. पदवी संपादन करून नोकरीत असणाऱ्या १४० शिक्षकांची प्रश्नावली भरून घेतल्या नंतर उपयुक्तता श्रेणी पासून इतर माहिती पर्यन्तचा प्रतिसाद एकत्र केला). प्रत्येक श्रेणीत जो प्रतिसाद मिळालेला आहे. त्याचे टक्केवारीत रूपांतर केले. त्यामुळे त्या विधाना बाबत त्या त्या श्रेणीत अधिव्याख्यात्यांची व शिक्षकांची असणारी मते ही टक्केवारीत समजू शकली. अशा प्रकारे प्रत्येक प्रश्नाचा प्रतिसाद व त्या प्रतिसादाचे प्रश्नावली भरून घेतल्या.

अधिव्याख्यात्यांच्या कडून प्रश्नावली भरून घेतल्या नंतर १४० शिक्षकाकडून प्रत्येक प्रश्ना बाबतचा प्रतिसाद एकत्र केला. आवश्यक त्या ठिकाणी प्रतिसादाचे टक्केवारीत रूपांतर केले. त्यानंतर प्रश्नावली मधील प्रत्येक प्रश्नाचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करून त्यासंदर्भात अन्वयार्थ लावला. यासाठी संशोधिकेने घेतलेल्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचाही उपयोग केला.

प्रश्नावलीतील प्रत्येक विधाना बाबत शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण व अर्थ निर्वाचन करून त्या संदर्भात अन्वयार्थ लावला. यासाठी अधिव्याख्यातांनी प्रश्नावलीतून दिलेल्या माहितीचा आणि अधिव्याख्याते यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या संदर्भित माहितीचा उपयोग केला.

समारोप :-

प्रस्तुत प्रकरणात सदर संशोधनासाठी वापरलेल्या सर्वेक्षण पध्दतीचे स्वरूप हेतू तंत्रे व महत्त्व यांची चर्चा केली आहे. शिवाय संशोधनासाठी आवश्यक त्या साधनसामुग्रीच्या उपलब्धतेसाठी संशोधन साधन म्हणून वापरलेली प्रश्नावली, निरीक्षण मुलाखती ही साधने जनसंख्या व नमुना निवड आणि सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वाचन याबाबतच्या विश्लेषणात्मक उहापोह केला आहे. या संशोधन साधनाच्या आधारे गोळा केलेल्या साधनसामुग्रीचे वर्गीकरण व विश्लेषण पुढील प्रकरणात केले आहे.

0 0 0 0